* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

**प्रेस नोट**

---

दिनांक :– २०/०३/२०१९

***मा.पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांची गुन्हेगारी टोळीशी संबंध असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याविरुध्द बडतर्फीची कार्यवाही.***

दिनांक १७/०३/२०१९ फिर्यादी रणजित पांडुरंग गायकवाड रा. शिरुर, ता शिरुर, जिल्हा पुणे ग्रामीण याला आरोपी मारोती सुधाकर गुडापे रा.भेंडोली यांनी यातील नमुद ठिकाणी सोन्याचे नाणे दाखवुन माझ्याकडे ३ किलो सोन आहे ते मी तुम्हाला १४,००,०००/– रुपयात देतो असे म्हटले असता फिर्यादी यांनी १२,००,०००/– रुपयात सदर सोन्याचा सौदा केला व आरोपीने फिर्यादीस सदर व्यवहार करण्यासाठी हातला फाटा या घटनास्थळी बोलाविले त्यामुळे फिर्यादी हा सोबत १२,००,०००/– रुपये घेऊन घटनास्थळी आला असता आरोपीने फिर्यादीस कुठल्याही प्रकारचे सोने न देता पोलीसा सारखे खाकी कपडे वापरुन व हातात प्लॅस्टीक लाठी घेऊन बिना क्रमांकाची बोलेरो वाहनात दोन ते तिन इसम घटनास्थळी आले व लबाडीने फिर्यादी जवळचे १२,००,०००/– रुपये घेऊन पळुन गेले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन पो स्टे पोखाळी, जिल्हा यवतमाळ येथे दिनांक १७/०३/१९ रोजीचे २२.०५ वाजता अ प क्र ७६/१९ कलम ४२०,४७१,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना वाशिम जिल्हा पोलीस दलाचे अस्थापनेवर कार्यरत असलेले परंतु स्वमर्जीने कर्तव्यावर गैरहजर व रुग्णनिवेदनात असलेले पोलीस शिपाई १२७२/ मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पो स्टे मंगरुळपीर तसेच पोलीस शिपाई ६६२/कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पो स्टे कारंजा ग्रामीण यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. नमुद कर्मचारी यांनी पोलीस खात्याला काळीमा लावणारे कृत्य करुन लोकांची दिशाभुल करुन फसवणुकीचा गंभीर गुन्हा केला आहे.

आपण शिस्तप्रिय पोलीस खात्यामध्ये कार्यरत असुन जनतेचे संरक्षण व त्यांच्या मालमत्तेचे सरंक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर असताना सुध्दा गुन्हेगारी टोळीशी संबंध साधुन निंदनिय लांच्छानास्पद गुन्हेगारीवृत्तीचे हिन वर्तन केले आहे. त्यामुळे वाशिम जिल्हा पोलीस अधिक्षक मा. श्री.वसंत परदेशी यांनी संपुर्ण प्रकाराची शहानिशा करुन गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालणाऱ्या कर्मचारी यांचेवर भारतीय संविधानाच्या अधिकाराचा वापर करुन पो.शि १२७२/ मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पो स्टे मंगरुळपीर तसेच पो. शि. ६६२/कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पो स्टे कारंजा ग्रामीण यांना शासकिय सेवेतुन बडतर्फ करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

तरी वाशिम जिल्हा पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की, आपल्या वर्दीची शान राहिल, पोलीस खात्याची मान उंचावेल अशीच कामगिरी अपेक्षित आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालणारे अधिकारी/कर्मचारी यांना माफी नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

Sd/- 20/3/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम

9 MAR 2019

क्रमांक :- पोअवा/विचौ/पी-६७(१)/पो.कर्म./बडतर्फ/२०१९ 2598 वाशिम दिनांकः- १९.३.२०१९

**भारतीय संविधानाच्या अनुच्छेद क्र.३११ च्या दुस-या परंतुकाच्या पोट कलम (ब) खालील आदेश**

ज्याअर्थी पोशि/१२७२ मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर व पोशि/६६२ कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पोस्टे.कारंजा ग्रामीण येथे नेमणुकीस असुन आपण दिनांक १७.३.२०१९ फिर्यादी रणजित पांडुरंग गायकवाड रा.शिरुर ता.शिरुन जि.पुणे ग्रामीण याला आरोपी मारोती सुधाकर गुडापे रा. भेंडोली यांनी यातील घ.ता.वेळी व ठिकाणी सोन्याचे नाणे दाखवुन माझेकडे तीन किलो सोने आहे ते तुम्हाला मी १४,००,०००/- रुपयात देतो असे म्हटले असता फिर्यादी याने १२,००,०००/- रुपयांत सदर सोन्याचा सौदा केला व आरोपीने फिर्यादीस सदरचा व्यवहार करण्यासाठी हातला फाटा या घटनास्थळी बोलविले त्यामुळे फिर्यादी हा सोबत १२,००,०००/- रुपये घेवुन घटनास्थळी आला असता आरोपीने फिर्यादीस कुठल्याही प्रकारचे सोने न देता पोलीसासारखे खाकी कपडे वापरुन व हातात प्लॅस्टीक लाठी घेवुन बिना नंबरची बोलेरो वाहनात दोन ते तीन इसम घटनास्थळी आले. व लबाडीने फिर्यादी जवळचे १२,००,०००/- रुपये घेवुन पळुन गेले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन पोस्टे.पोफाळी जि.यवतमाळ येथे दिनांक १७.३.२०१९ रोजीचे २२.०५ वाजता अप. क्रमांक ७६/२०१९ कलम ४२०, ४७१, ,३४ भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

तसेच सदर पोशि/१२७२ मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर दिनांक १७.३.२०१९ रोजी वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची सुचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहीले. व पोशि/६६२ कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पोस्टे.कारंजा ग्रामीण हे दिनांक २१.२.२०१९ पासुन सिक रजेवर आहे. सिक रजेवर असतांना सदर कालावधीमध्ये सिक गैरहजर राहुन त्यांनी सदरचे कृत्य केल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे.

ज्याअर्थी आपला गुन्हेगारी टोळीशी संबंध असुन लोकांची दिशाभुल करुन फसवणुकीचा गंभीर गुन्हा केला आहे. आपण शिस्तप्रिय पोलीस खात्यामध्ये कार्यरत असुन जनतेचे सरंक्षण व त्यांच्या मालमत्तेचे सरंक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर असतांना सुध्दा तसेच जनतेची सुरक्षेची, जनतेस न्याय मिळुन देण्यासारखे सक्षम व भरीव कामगीरी करण्याचे कर्तव्यावर नेमलेले असतांना व जनतेस भयमुक्त, गुन्हेगारी मुक्त, असे जिवन जगु देण्यास हातभार लावण्याचे कर्तव्य करण्याचे कर्तव्य पार पाडण्याऐवजी, तुम्ही गुन्हेगारी टोळीशी संबंध साधुन निंदनिय, लांच्छनास्पद गुन्हेगारीवृत्तीचे हिन वर्तन करुन पोलीस खात्याच्या प्रतिमेस काळीमा फासणारे व अब्रु धुळीस मिळविणारे गंभीर व असभ्य वर्तन केले. त्यामुळे असे वर्तन करणा-या इसमास पोलीस खात्यामध्ये ठेवणे हे आंतरिक सुरक्षेच्या दृष्टीने तसेच जनसामान्यांच्या हिताच्या दृष्टीने घातक ठरेल.

त्याअर्थी संपुर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती काळजीपुर्वक विचारात घेतल्यानंतर माझी अशी खात्री झाली आहे की, या प्रकरणात तुमचे विरुध्द विभागीय चौकशी करुन कालापव्यय करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व्यवहार्य होणार नाही, म्हणुन पुढील नमुद केल्याप्रमाणे आदेश देत आहोत.

## आदेश

मी वसंत परदेशी, पोलीस अधीक्षक, वाशिम मला भारतीय संविधानाच्या परिच्छेद क्रमांक ३११ (२)(ब) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन पोशि/१२७२ मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर व पोशि/६६२ कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पोस्टे.कारंजा ग्रामीण यांना सदरचे आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासुन शासकिय सेवेतुन बडतर्फ (Dismissed from Service) करीत आहे.

(वसंत परदेशी, भापोसे)
पोलीस अधीक्षक,वाशिम

**प्रति,**

१.पोशि/१२७२ मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर
२.पोशि/६६२ कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पोस्टे.कारंजा ग्रामीण

**<u>मार्फत व प्रतः</u>**- पोलीस निरीक्षक पोस्टे.मंगरुळपीर/कारंजा ग्रामीण

२/-    सदर आदेशाच्या प्रति आपणाकडे पाठविण्यांत येत असुन त्यातील एक एक प्रत संबंधितास अदा करुन व दुय्यम प्रतिवर त्यांच्या दिनांकीत स्वाक्षरी घेऊन ती दुय्यत प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करावी. तसेच एक प्रत आपले अभिलेखावर आवश्यक त्या कार्यवाहीस ठेवावी.

**प्रतिलिपीः** प्रमुख लिपींक आस्थापना शाखा/लेखाशाखा/वेतन लिपीक-२/वेतननिश्चिती लिपीक/ भविष्य निर्वाह निधी लिपीक/डीपीजी लिपीक यांना माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

**प्रत माहीतीस** :- उपविभागीय पोलीस अधिकारी,मंगरुळपीर/कारंजा यांना माहीती करिता.